महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३०५१ Email ID : napu22.mhpds@gov.in

---

क्रमांक : क्र. अधापु- २०२१/ प्र.क्र. १३/ना.पु.-२२ दिनांक : १६ फेब्रुवारी, २०२१

प्रति

१) जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे)
२) नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई.
३) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी (सर्व जिल्हे),
४) अन्नधान्य वितरण अधिकारी (पुणे, नागपूर, सोलापूर),

विषय :- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत राज्यातील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी माहे एप्रिल, २०२१ ते जून, २०२१ करिता वितरीत करावयाच्या अन्नधान्याचे मासिक नियतन.

संदर्भ :- १) केंद्र शासनाचे क्र. १-८/२०१३-बीपी-III, दि. १०.१२.२०१४ चे पत्र.
२) केंद्र शासनाचे क्र. १-४/२०१९-बीपी-III, दि. २२.१२.२०२० चे पत्र
३) शासन पत्र क्रमांक:- अधापु-२०१७/प्र.क्र.८२/नापु-२२, दि. २७.६.२०१७

केंद्र शासनाने संदर्भाधीन दि. १०.१२.२०१४ व दि. २२.१२.२०२० च्या पत्रान्वये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत मंजूर केलेल्या नियतनाच्या मर्यादेत राज्यातील जिल्हयांना अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांकरीता माहे एप्रिल, २०२१ ते जून, २०२१ करिता याद्वारे नियतन मंजूर करण्यात येत आहे. जिल्हानिहाय मासिक नियतनाचा तपशिल सोबतच्या विवरणपत्र "अ" व "ब" मध्ये दर्शविण्यात आला आहे.

२. RCMS प्रणालीवरील दि. ३१.०१.२०२१ पर्यंतच्या लाभार्थ्यांची उपलब्ध आकडेवारी विचारात घेऊन सदर नियतन देण्यात आले आहे. लाभार्थी निवड ही निरंतर प्रक्रीया असल्याने शिल्लक राहिलेल्या इष्टांकानुसार सर्व जिल्ह्यांना विशिष्ट प्रमाणात विभागून त्या जिल्ह्यांमधील RCMS प्रणालीवरील उपलब्ध असलेल्या लाभार्थ्यांपेक्षा अधिक लाभार्थ्यांसाठी नियतन देण्यात आले आहे.

३. माहे एप्रिल, २०२१ ते जून, २०२१ च्या नियतनाकरिता भारतीय अन्न महामंडळाकडे रकमा जमा करण्याची व अन्नधान्याच्या उचलीची मुदत लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील मुदतीप्रमाणे म्हणजेच नियतन महिन्याच्या आधीच्या महिन्यातील शेवटच्या दिनांकापर्यंत राहील. केंद्र शासनाने राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत दिलेल्या नियतनाच्या अन्नधान्याच्या उचलीसाठी मुदतवाढ देण्यात येणार नसल्याचे स्पष्ट केले असल्याने, अंतिम दिनांकाची वाट न पाहता

संदर्भाधीन दि. २७ जून, २०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांनुसार विहित मुदतीत रक्कम जमा करुन, अन्नधान्याच्या उचल पूर्ण करावी. सदर अन्नधान्य ₹ ३/- प्रतिकिलो दराने तांदूळ व ₹ २/- प्रतिकिलो दराने गहू या सुधारित दराने प्रवर्गनिहाय निश्चित केलेल्या परिमाणात वाटप होईल याची दक्षता घ्यावी.

**४. सद्यस्थितीत e PoS द्वारे अन्नधान्याचे वितरण होत असल्याने मागील महिन्यात झालेल्या वितरणानंतर पुढील महिन्याकरिता वाटपासाठी आवश्यक असलेल्या अन्नधान्याचा आढावा घेण्यात यावा. त्यानुसार पुढील महिन्यासाठी अन्नधान्याची उचल करताना गोदामामध्ये अतिरिक्त साठा जमा होणार नाही, याद्दष्टीने गोदामातील मागील महिन्यापर्यंतच्या अन्नधान्याची शिल्लक विचारात घेऊन याद्वारे दिलेल्या नियतनापैकी आवश्यकते एवढ्याच अन्नधान्याची उचल करावी.**

**शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, केंद्र शासनाने अन्नधान्याच्या उचलीस मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे वारंवार स्पष्ट केलेले असतानादेखील अनेक जिल्ह्यांकडून पहिल्या मुदतवाढीची व काही जिल्ह्यांकडून दुसऱ्या मुदतवाढीची मागणी करण्यात येत असल्याने केंद्र शासनाकडून राज्य शासनावर ताशेरे ओढले जात आहेत. अशी मुदतवाढ मागताना त्या जिल्ह्यामध्ये PoS मशीनद्वारे होणाऱ्या वाटपाएवढी अन्नधान्याची उचल झाली आहे किंवा कसे तसेच, प्रत्येक गोदामातील अन्नधान्याची त्यावेळची शिल्लक विचारात घेऊन जिल्ह्यामध्ये PoS मशीनद्वारे होणाऱ्या वाटपाएवढे अन्नधान्य उपलब्ध आहे किंवा कसे याबाबत पहिली अथवा दुसरी मुदतवाढ मागताना आढावा घेण्यात यावा. अशा प्रकारे PoS मशीनद्वारे होणाऱ्या वाटपाएवढे अन्नधान्य उपलब्ध नसल्यास अपरिहार्य कारणास्तव मुदतवाढीची मागणी करण्यात यावी. जिल्ह्यातील गोदमामध्ये अन्नधान्य शिल्लक असल्यास त्याचा आढावा न घेता मुदतवाढीची मागणी केली असल्याचे यापुढे निदर्शनास आल्यास संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्यावर कामात कुचराई केल्याबद्दल शिस्तभंगाची कारवाई केली जाईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

५. शासनाचे सदर नियतन मंजूरीचे आदेश उपआयुक्त (पुरवठा) व इतर सर्व संबंधितांना ई-मेलद्वारे पाठविण्यात आले आहेत. तरी, नियतन मंजूरीचे आदेश प्राप्त न झाल्यामुळे धान्याची विहित मुदतीत उचल करता आली नाही व त्यामुळे नियतन व्यपगत झाले, ही सबब विचारात घेतली जाणार नाही व याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

६. भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून गहू व तांदूळ स्विकारताना शासनाच्या निर्देशानुसार नमुने घेऊन संयुक्तपणे धान्याचा दर्जा तपासून तो समाधानकारक असल्याची खात्री करुनच धान्याची उचल करण्यात यावी. यासंबंधी शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच सदर संयुक्त तपासणीच्या वेळी उपस्थित असलेल्या भारतीय अन्न महामंडळाच्या व शासनाच्या प्रतिनिधींची नावे, त्यांचे पद व तपासणीचा दिनांक व स्थळ याबाबतची जिल्हानिहाय माहिती अन्नधान्याची उचल पूर्ण झाल्यानंतर तत्काळ शासनास सादर करावी. सदर माहिती पुढील महिन्याच्या शासनाच्या नियतन आदेशापूर्वी प्राप्त न झाल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

७. सदर अन्नधान्य राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ मधील कार्यपद्धती प्रमाणे वितरीत करण्याची दक्षता घेण्यात यावी. शिधापत्रिकाधारकास रास्तभाव धान्य दुकानांच्या माध्यमातून सदर

धान्याचे वाटप विहित परिमाणात होत असल्याची खातरजमा करण्याबाबत संबंधितांना सूचना द्याव्यात. अन्नधान्याचे योग्य वाटप होत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

८. सार्वजनिक वितरण व्यवस्था नियंत्रण आदेश, २०१५ मधील तरतूदीनुसार "उपयोगिता प्रमाणपत्र" नियमितपणे सादर करणे अनिवार्य आहे.

९. सोबतच्या विवरणपत्रांतील नियतनाच्या तक्त्यांमध्ये दर्शविलेल्या परिमाणानुसारच लाभार्थ्यांना धान्याचे वितरण करणे अनिवार्य आहे.

१०. **माहे एप्रिल, २०२१ ते जून, २०२१** साठी अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांकरीता नियतनानुसार गहू व तांदुळाचा साठा मुक्त करण्याच्या सूचना भारतीय अन्न महामंडळास स्वतंत्रपणे देण्यात आल्या आहेत.

११. मंजुर नियतनानुसार अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांकरीता गहू व तांदळाची उचल करुन वाटप करावे व केलेल्या उचल व वाटपाची माहिती न चुकता "महाफूड" आज्ञावलीत दर आठवडयास वेळीच भरावी. नियतन, उचल व वाटप यासंबंधीची माहिती वेबसाईटवर प्रदर्शित करण्याबाबत शासन स्तरावरुन वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच भारतीय अन्न महामंडळाकडून केलेल्या उचलीबाबतची व रास्तभाव दुकानदारांनी केलेल्या उचलीबाबतची माहिती दररोज Google drive वर भरावी. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी उपसंचालक, नागरी पुरवठा यांची राहील.

ने. प्र. मानकामे

(नेत्रा प्र. मानकामे)
शासनाचे अवर सचिव

सोबत:- विवरणपत्र "अ" व "ब"

प्रत:- १) सर्व उप आयुक्त (पुरवठा)

त्यांना सूचित करण्यात येते की, नियतनाचे आदेश सर्व जिल्हयांना ई-मेल व पत्राद्वारे पाठविण्यात आले आहेत. आपल्या विभागातील जिल्हयांना सदर आदेश प्राप्त झाले किंवा कसे याबाबत खातरजमा करण्यात यावी. आपल्या विभागातील सर्व जिल्हयांमध्ये नियतनानुसार धान्याची उचल होत असल्याची व त्याबाबतची माहिती "महाफूड" आज्ञावलीत दर आठवडयास भरली जाण्याची योग्य ती दखल घ्यावी.

२) उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई, यांनी प्रस्तुत नियतनानुसार जिल्हयांनी केलेली उचल व वाटप याबाबतचा तपशील "महाफूड" आज्ञावलीद्वारेच प्राप्त करुन घ्यावा. तसेच सातत्याने पाठपुरावा करुन Google drive वर उचल व वाटपाबाबतची माहिती संकलत करण्याची सर्व जबाबदारी उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई यांची राहील.

३) अवर सचिव, संगणक कक्ष, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांनी प्रस्तुत नियतनाची प्रत विभागाच्या वेबसाईटवर अपलोड करावी.

(नेत्रा प्र. मानकामे)
शासनाचे अवर सचिव

सोबत:- विवरणपत्र "अ" व "ब"

प्रत :- १) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.

२) निवड नस्ती (कार्यासन, नापु-२२)

विवरणपत्र "अ"

शासन पत्र क्र. अधापु- 2021/प्र.क्र. 13/नापु-22, दि. 16.02.2021 सोबतचे विवरणपत्र "अ"

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, 2013 अंतर्गत "अंत्योदय अन्न योजने" तील लाभार्थ्यांसाठी माहे एप्रिल, 2021 ते जून, 2021 करिता मासिक नियतन

| अ.क्र | जिल्हा | कार्डसंख्या | मासिक नियतनाचे परिमाण | | मासिक नियतन (मे.टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | मासिक एकूण अन्नधान्य |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | A Region | 1308 | 18 | 17 | 24 | 22 | 46 |
| | D Region | 379 | 18 | 17 | 7 | 7 | 14 |
| | E Region | 2601 | 18 | 17 | 47 | 44 | 91 |
| | F Region | 13494 | 18 | 17 | 243 | 229 | 472 |
| | G Region | 1993 | 18 | 17 | 36 | 34 | 70 |
| 2 | ठाणे | 49130 | 10 | 25 | 491 | 1228 | 1719 |
| 3 | पालघर | 94006 | 10 | 25 | 940 | 2350 | 3290 |
| 4 | रायगड | 84920 | 10 | 25 | 849 | 2123 | 2972 |
| 5 | रत्नागिरी | 40679 | 10 | 25 | 407 | 1017 | 1424 |
| 6 | सिंधुदुर्ग | 23628 | 10 | 25 | 236 | 591 | 827 |
| 7 | नाशिक | 178991 | 25 | 10 | 4475 | 1790 | 6265 |
| 8 | धुळे | 77109 | 23 | 12 | 1774 | 925 | 2699 |
| 9 | जळगांव | 135092 | 25 | 10 | 3377 | 1351 | 4728 |
| 10 | नंदूरबार | 105994 | 23 | 12 | 2438 | 1272 | 3710 |
| 11 | अहमदनगर | 89705 | 25 | 10 | 2243 | 897 | 3140 |
| 12 | पुणे ग्रामीण | 49481 | 25 | 10 | 1237 | 495 | 1732 |
| 13 | पुणे शहर | 8429 | 25 | 10 | 211 | 85 | 296 |
| 14 | सोलापूर ग्रामीण | 56844 | 25 | 10 | 1421 | 568 | 1989 |
| 15 | सोलापूर शहर | 7211 | 25 | 10 | 180 | 72 | 252 |
| 16 | कोल्हापूर | 53891 | 25 | 10 | 1347 | 539 | 1886 |
| 17 | सांगली | 32092 | 25 | 10 | 802 | 321 | 1123 |
| 18 | सातारा | 28827 | 25 | 10 | 721 | 288 | 1009 |
| 19 | औरंगाबाद | 66889 | 24 | 11 | 1605 | 736 | 2341 |
| 20 | जालना | 44497 | 23 | 12 | 1023 | 534 | 1557 |
| 21 | नांदेड | 81620 | 23 | 12 | 1877 | 979 | 2856 |
| 22 | बीड | 40760 | 23 | 12 | 937 | 489 | 1426 |
| 23 | उस्मानाबाद | 39362 | 23 | 12 | 905 | 472 | 1377 |
| 24 | परभणी | 44972 | 23 | 12 | 1034 | 540 | 1574 |
| 25 | लातूर | 42448 | 23 | 12 | 976 | 509 | 1485 |
| 26 | हिंगोली | 30799 | 23 | 12 | 708 | 370 | 1078 |
| 27 | अमरावती | 126534 | 15 | 20 | 1898 | 2531 | 4429 |
| 28 | वाशिम | 49584 | 15 | 20 | 744 | 992 | 1736 |
| 29 | अकोला | 45278 | 15 | 20 | 679 | 906 | 1585 |
| 30 | बुलढाणा | 65605 | 21 | 14 | 1378 | 918 | 2296 |
| 31 | यवतमाळ | 131436 | 16 | 19 | 2103 | 2497 | 4600 |
| 32 | नागपूर ग्रामीण | 78860 | 15 | 20 | 1183 | 1577 | 2760 |
| 33 | नागपूर शहर | 45300 | 15 | 20 | 680 | 906 | 1586 |
| 34 | वर्धा | 48950 | 15 | 20 | 734 | 979 | 1713 |
| 35 | भंडारा | 66119 | 10 | 25 | 661 | 1653 | 2314 |
| 36 | गोंदिया | 78909 | 10 | 25 | 789 | 1973 | 2762 |
| 37 | चंद्रपूर | 139665 | 15 | 20 | 2095 | 2793 | 4888 |
| 38 | गडचिरोली | 101906 | 10 | 25 | 1019 | 2548 | 3567 |
| राज्याची एकूण | | 2505300 | | | 46534 | 41150 | 87684 |

| विवरणपत्र "ब" | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शासन पत्र क्र. अधापु-2021/प्र.क्र.13/नापु-22, दि. 16.02.2021 सोबतचे विवरणपत्र "ब" | | | | | | | |
| राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, 2013 अंतर्गत "प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यां" साठी एप्रिल, 2021 ते जून, 2021 करिता मासिक नियतन | | | | | | | |
| अ.क्र | जिल्हा | लाभार्थी सदस्यसंख्या | मासिक नियतनाचे परिमाण | | मासिक नियतन (मे.टन) | | |
| | | | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | एकूण मासिक अन्नधान्य |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | A Region | 758016 | 3 | 2 | 2274 | 1516 | 3790 |
| | D Region | 1091163 | 3 | 2 | 3273 | 2182 | 5455 |
| | E Region | 2461560 | 3 | 2 | 7385 | 4923 | 12308 |
| | F Region | 3227722 | 3 | 2 | 9683 | 6455 | 16138 |
| | G Region | 1225114 | 3 | 2 | 3675 | 2450 | 6125 |
| 2 | ठाणे | 514010 | 2 | 3 | 1028 | 1542 | 2570 |
| 3 | पालघर | 1467101 | 2 | 3 | 2934 | 4401 | 7335 |
| 4 | रायगड | 1490559 | 2 | 3 | 2981 | 4472 | 7453 |
| 5 | रत्नागिरी | 1042381 | 2 | 3 | 2085 | 3127 | 5212 |
| 6 | सिंधुदुर्ग | 608611 | 2 | 3 | 1217 | 1826 | 3043 |
| 7 | नाशिक | 2957328 | 3 | 2 | 8872 | 5915 | 14787 |
| 8 | धुळे | 1142283 | 2 | 3 | 2285 | 3427 | 5712 |
| 9 | जळगांव | 2199654 | 3 | 2 | 6599 | 4399 | 10998 |
| 10 | नंदूरबार | 732254 | 2 | 3 | 1465 | 2197 | 3662 |
| 11 | अहमदनगर | 2662454 | 3 | 2 | 7987 | 5325 | 13312 |
| 12 | पुणे ग्रामीण | 2507170 | 3 | 2 | 7522 | 5014 | 12536 |
| 13 | पुणे शहर | 1289758 | 3 | 2 | 3869 | 2579 | 6448 |
| 14 | सोलापूर ग्रामीण | 1747329 | 3 | 2 | 5242 | 3495 | 8737 |
| 15 | सोलापूर शहर | 506148 | 3 | 2 | 1518 | 1012 | 2530 |
| 16 | कोल्हापूर | 2300924 | 3 | 2 | 6903 | 4602 | 11505 |
| 17 | सांगली | 1743102 | 3 | 2 | 5229 | 3486 | 8715 |
| 18 | सातारा | 1701939 | 3 | 2 | 5106 | 3404 | 8510 |
| 19 | औरंगाबाद | 2008212 | 3 | 2 | 6025 | 4016 | 10041 |
| 20 | जालना | 1328575 | 3 | 2 | 3986 | 2657 | 6643 |
| 21 | नांदेड | 1933844 | 3 | 2 | 5802 | 3868 | 9670 |
| 22 | बीड | 1501209 | 3 | 2 | 4504 | 3002 | 7506 |
| 23 | उस्मानाबाद | 983991 | 3 | 2 | 2952 | 1968 | 4920 |
| 24 | परभणी | 1024570 | 3 | 2 | 3074 | 2049 | 5123 |
| 25 | लातूर | 1545048 | 3 | 2 | 4635 | 3090 | 7725 |
| 26 | हिंगोली | 723796 | 3 | 2 | 2171 | 1448 | 3619 |
| 27 | अमरावती | 1372916 | 3 | 2 | 4119 | 2746 | 6865 |
| 28 | वाशिम | 766588 | 3 | 2 | 2300 | 1533 | 3833 |
| 29 | अकोला | 1099602 | 3 | 2 | 3299 | 2199 | 5498 |
| 30 | बुलढाणा | 1529682 | 3 | 2 | 4589 | 3059 | 7648 |
| 31 | यवतमाळ | 1434782 | 3 | 2 | 4304 | 2870 | 7174 |
| 32 | नागपूर ग्रामीण | 1363056 | 3 | 2 | 4089 | 2726 | 6815 |
| 33 | नागपूर शहर | 1422303 | 3 | 2 | 4267 | 2845 | 7112 |
| 34 | वर्धा | 899250 | 3 | 2 | 2698 | 1799 | 4497 |
| 35 | भंडारा | 741741 | 2 | 3 | 1483 | 2225 | 3708 |
| 36 | गोंदिया | 660681 | 2 | 3 | 1321 | 1982 | 3303 |
| 37 | चंद्रपूर | 1053703 | 3 | 2 | 3162 | 2107 | 5269 |
| 38 | गडचिरोली | 445802 | 2 | 3 | 892 | 1337 | 2229 |
| राज्याची एकूण | | 59215931 | | | 168804 | 127275 | 296079 |

Government of Maharashtra

Food, Civil Supplies & Consumer Protection Department,
Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,,
Mantralay Annex, Mumbai-400 032

Telephone: 022-22793051
Email ID : napu22.mhpds@gov.in

---

No.- ADHAPU-2021/C.R.13/CS-22

Date :- 16th February, 2021

To,

The General Manager (Mah),
Food Corporation of India,
Regional Office (Maharashtra),
FSD Complex,
Dattapada Road, Rajendra Nagar,
Borivali (E), Mumbai- 400 066.

Sub :- Monthly Allocation of Foodgrains for Priority Households & AAY Category under NFSA, 2013 for the month of April, 2021 to June, 2021.

Ref :- 1) Govt. of India letter No. 1-8/2013.BP.III, Dtd. 10.12.2014
2) State Govt. Letter of even no. Dtd.16th February, 2021.

Sir,

Government of India vide its above referred letter dated 10.12.2014 has sanctioned revised monthly allocation for Priority households & AAY category under NFSA, 2013 for the month of January, 2015 and onwards. Accordingly, the State Government has issued district wise allocation orders for the month of April, 2021 to June, 2021 vide above referred letter dated 16th February, 2021 (copy enclosed).

You are therefore requested to release the allocated quota for Priority households & AAY category to the nominees of District Collector's and Controller of Rationing, Director, Civil Supplies, Mumbai as per the statement attached under intimation to this Government.

Yours faithfully,

Mankame

(N. P. Mankame)
Under Secretary to Government of Maharashtra

Copy to:1) Financial Advisor & Deputy Secretary, F.C.S & C.P. Dept, Mumbai.
2) Select file, Desk CS-22.

C:\Shashank\Shashank\NFSA Allocation\Allocation 2021-22\April 2021 onwards.docx